महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र.:तंशिविकापु/विवि-५/अमली पदार्थ प्रतिबंध/२०२५/ 935 दिनांक - 19 MAR 2025

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था

**विषय :** अमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजनेचा कृती आराखडा सादर करणे बाबत..

**संदर्भ :** १.मा. पालकमंत्री सांगली जिल्हा,यांचे जि १६/०३/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश
२. शासकीय तंत्र निकेतन मिरज यांचे पत्र क्र.शातंमि/एनएसएस/१,दि. १३/०३/२०२५
३. शासकीय तंत्र निकेतन मिरज यांचे पत्र क्र.शातंमि/एनएसएस/अमली पदार्थ कृती आराखडा/५०८,दि. १९/०३/२०२५

उपरोक्त संदर्भांकित विषयास अनुसरून कळविण्यांत येते की संदर्भ क्र. १ अन्वये मा.पालकमंत्री महोदय,यांचे दिनांक १३/०३/२०२५ रोजीच्या बैठकीत मा.पालकमंत्री सांगली जिल्हा यांनी,संदर्भिय पत्र क्र.२ च्या पत्रामध्ये अमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजनेचा कृती आराखड्या नमूद केलेले कार्यक्रम संस्थांनी घ्यावयाचे निर्देशित केले आहे. सोबत संदर्भिय क्र.२ ची प्रत सादर करण्यांत येत आहे.

तसेच संदर्भिय क्र.२ च्या पत्रात नमूद कृती आराखड्यानुसार सर्व संस्थांनी कार्यक्रम राबवून केलेल्या कार्यावाहीचा अहवाल शासकीय तंत्रनिकेतन, मिरज या संस्थेस दि. २१/०३/२०२५ पर्यन्त ईमेल द्वारे सादर करावा. (gpmiraj@gmail.com)
सोबत - वरीलप्रमाणे

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\जाधव म.मा\परिपत्रक २०२४.docx

महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज
माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
(Email : gpmiraj@gmail.com) (Website : www.gpmiraj.ac.in)

जा क्र शातंमि /एनएसएस/१ दि १६/०३/२०२५

प्रती,

मा. पालकमंत्री, सांगली

विषय: अमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजनेचा कृती आराखडा सादर करणेबाबत

संदर्भ : माननीय पालकमंत्री यांचे दिनांक १६/०३/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश

कृतीआराखडा

१) तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांमध्ये अमली पदार्थ वापरामुळे होणाऱ्या परिणामाबाबत जनजागृती करणेसाठी खालील स्पर्धा आयोजित करणे

अ) रिल्स तयार करणे
ब) जिंगल तयार करणे
क) पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा

सर्व संस्था वरील स्पर्धा संस्थास्तरावर दि २१/०३/२०२५ पर्यंत आयोजित करतील व विजेत्यांना संस्था स्तरावर पारितोषिके दिली जातील. सर्व विजेत्यांसाठी जिल्हास्तरावर स्पर्धा दि २८/०३/२०२५ रोजी आयोजित करून विजेत्यांना पारितोषिके दिले जातील.

२) सर्व संस्था एनएसएसच्या माध्यमातून अमली पदार्थांच्या वापरामुळे होणाऱ्या परिणामाबाबत जनजागृती करणेसाठी पथनाट्ये विविध ठिकाणी जाऊन सादर करतील

३) सर्व संस्था अमली पदार्थांच्या वापरामुळे होणाऱ्या परिणामाबाबत व्याख्याने आयोजित करतील तसेच अमली पदार्थांचा वापर न करण्याबाबत शपथ घेतील

४) वरील कृती आराखड्याची अंमलबजावणी करणे बाबत माननीय सहसंचालक , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांच्याकडून सहमती घेऊन त्याअनुषंगाने लागणारे निर्देश सर्व संस्थांना लिखित स्वरूपात प्राप्त करून घेणे

(डॉ सं अ. परदेशी)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, मिरज
माजी सैनिक वसाहती जवळ, एम.आय.डी.सी.एरिया, विद्यानगर, मिरज-४१६ ४१०.
दुरध्वनी क्रमांक - कार्यालय (०२३३) २२३१४२३ कार्यालय (०२३३) २२३१२६९
(Email : gpmiraj@gmail.com) (Website : www.gpmiraj.ac.in)

Urgent Pl.

जा.क्र.शातंमि/एनएसएस/अमली पदार्थ कृती आराखडा/ ५०८

दिनांक : १९-०३-२०२५

प्रति,

मा. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
तंत्रशिक्षण मंडळाची नविन इमारत,
४१२-ई, बहिरट पाटील मार्ग, शिवाजीनगर,
पुणे ४११०१६.

विषय :- अमली पदार्थ प्रतिबंधक उपाययोजनेचा कृती आराखडा सादर करणे बाबत..

संदर्भ :- १) मा.पालक मंत्री, सांगली जिल्हा यांचे दि.१६-०३-२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देश.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. शातंमि/एनएसएस/१ दि.१६-०३-२०२५.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय क्र.१ च्या बैठकीमध्ये निर्देशीत केले नुसार संदर्भिय क्र.२ च्या पत्रामध्ये नमुद कृती आराखड्यास कृपया मान्यता मिळावी ही विनंती. तसेच सदर कृती आराखड्यामध्ये नमुद करणेत आले नुसार कार्यक्रम घेणेबाबत आपल्या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांना आपले स्तरावरुन कळविण्यात यावे. सोबत संदर्भिय क्र.२ ची प्रत सादर करण्यात येत आहे.

तसेच संदर्भिय क्र.२ च्या पत्रामध्ये नमुद कृती आराखडा नुसार सर्व संस्थांनी कार्यक्रम राबवून त्याचा अहवाल शासकीय तंत्रनिकेतन, मिरज या संस्थेस सादर करणेबाबत सर्व संस्थांना निर्देश देण्यात यावेत ही विनंती.

आपला विश्वासु,

(डॉ. खा.म. बागवान)
प्र.प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, मिरज.

सोबत : वरील प्रमाणे.

सर्व संस्थांना
कळविले कृती आराखडा
प्राचार्य शा.तं. मिरज
यांचेकडे दि. २०/०३/२५
पर्यंत पाठवाव्या.